# १९७५ नंतरच्या काळातील मराठी कवितेतून व्यक्त होणारी स्त्री जीवनजाणीव:

**डॉ. वैशाली विजय जावळेकर**
मराठी विभागप्रमुख
मॉडर्न एज्यु.सो.डी.जी.रुपारेल महाविद्यालय,
सेनापती बापट मार्ग,माहीम मुंबई ४०००१६
मोबाईल नं. - ९८६९४७७२३७
Email - vaishali.jawalekar@ruparel.edu

---

कविता हा साहित्यप्रकार आत्मनिष्ठ अशा भावना,संवेदना-विचारांची उत्स्फूर्त अभिव्यक्ती आहे असे स्वीकारले की कवितेतून व्यक्त होणारी स्त्रीमनाची अभिव्यक्ती ही वैयक्तिक नेणीव ते स्त्रीमनाच्या सामुहिक जाणिवेपर्यंत आपण विस्तारू शकतो.१९७५ नंतरच्या मराठी कवितेतून अशीच एक सामुहिक घुसमट व्यक्त होऊ लागली असे म्हणता येईल..स्त्रीवादी जाणिवेच्या प्रातिनिधिक कवी म्हणून त्यांचा इथे आपण विचार करता येणार नाही.पण १९५५ पासून ते २००० पर्यंत कविता लिहिणाऱ्या इंदिरा संत एका आधुनिक स्त्रीचे प्रतिनिधित्व करतात.त्यांची कविता ही त्यांचे पती ना.मा.संत यांच्या चीरविरहाची केवळ करुण गाथा नाही.ती कविता वाचताना एका भारतीय आधुनिक स्त्रीच्या दृष्टीने जोडीदाराच्या मृत्युनंतरची एकाकीपणाची जाणीव नैराश्य,नकारात्मकदृष्ट्या अभिव्यक्त होत नाही,तर वेदना ज्या प्रतिभाधर्माने  कवितेतून व्यक्त होते त्यात संघर्षाची एक जीवनशैली दिसते. 'ऐक जरा ना'सारखी कविता स्वत:ला कोंडून घेतलेली अवस्था व्यक्त करते.एकटीने संसाराचा गाडा ओढवा लागणे,कमावतीचे 'कुटुंबप्रमुख' होणे ही दुहेरी ओढाताण इंदिराबाई सोसतात.त्यांचे वैयक्तिक दु:ख हे अतिशय सयंतपणे एकाकी स्त्रीच्या जीवनानुभवाचा सामाजिक संदर्भ घेऊन  वाचकासमोर साकार होत असतो.  भारतीय कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीची संसारातील परात्मता हा सामाजिक संदर्भ त्या विरहगीतांना आहे.इंदिरा बाईंची कविता स्त्रीवादी नाही.पण स्त्रीपणाचा शोध नक्कीच आहे.

ज्यांच्या कवितेमधून प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्त्रीवादी जाणीव व्यक्त होते अशा स्त्री कवी म्हणून प्रभा गणोरकर यांच्या कवितेचा विचार करता येईल.'विवर्त' पासून ते 'व्यामोह' पर्यंतच्या कवितांमधून समाजव्यवस्थेत 'स्व'चे स्थान शोधण्याचा किंवा ठरवण्याचा प्रयत्न आहे.त्याचबरोबर गणोरकरबाई समकालीन सामाजिक,राजकीय विशेषतः स्त्रीविषयक प्रश्नांवर भाष्य करताना दिसतात.कुटुंबगत स्त्री-पुरुष नातेसंबंधांचा सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या अर्थपूर्णता रेखित करतात.

१९७५ नंतरच्या काळातील स्त्री कवींमध्ये आत्मभान प्राप्त झालेल्या आणि व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या,आपली कविता हीच एक राजकीय विधान आहे याचे भान आलेल्या कवी म्हणून मल्लिका अमरशेख ,सिसिलिया कार्व्हालो,अश्विनी धोंगडे,नीरजा आणि प्रज्ञा पवार या स्त्री कवींच्या कविता समग्र 'स्त्रीसूक्त'म्हणता येतील.या कवींचे महानगरीय जीवनवास्तव लक्षात घेता.बदललेल्या भोवतालच्या शहरीकरण,आर्थिकस्तर किंवा



Research Hub International Journal

वर्गीय जाणिवांमुळे स्त्री असण्याचे मूल्यभान विविध पैलूंना स्पर्श करणारे ठरले.कुटुंबात उंबरठ्याआत आणि उंबरठ्याबाहेरही ‘पुरुषप्रधान’वर्चस्वाविरुद्ध संघर्ष समकालीन स्त्री अनुभवत होती.स्त्रीला पुरुषवर्गाचे सर्वस्तरीय धुरिणत्व झुगारून देत एक ‘नायिकेची’ गाथा रचण्याचे आव्हान होते.हे करताना इतिहास,पुराणकथा,मिथके यांचा परामर्श घेण्याची प्रेरणा या कवींनी दाखवली आहे.मल्लिका अमरशेख आणि अश्विनी धोंगडे यांच्या कवितांमधून स्त्री देहाच्या ‘दैहिक’,अपौरुषेय अनुभवाला मोकळी वाट करून दिली. अश्विनी धोंगडे यांच्या ‘अन्वय(१९९२) या संग्रहातील ‘सखी’या  कवितेतून मासिक पाळीला ‘सखे’ असे संबोधून पाळी विषयक संवेदन व्यक्त झाले आहे.

“ऐन सुखाच्या क्षणाची वाट पाहता ,स्त्रीजन्माच्या शापवाणीची भिंत बनून कधी आलीस ,”(पृ.३९)असा मुक्त संवाद दिसतो.वाळूचा प्रियकर (१९७९),’देहऋतु’ (१९९९) या संग्रहातील कवितांमधून व्यवस्थेच्या सांस्कृतिक चौकटीला ओलांडून स्त्रीच्या देहाच्या गरजा,स्त्री देहमनाचे अनोखेपण,तिची वासना याविषयी अभिव्यक्ती करण्याची बंडखोरी करतात.माणूसणाचं भिंग बदलल्यावर (२००७)या संग्रहातील’’संभोगातील दारूण लावण्य’ या कवितेततर मल्लिका स्त्रीपुरुषसंबंधातील अपरिहार्यता स्वीकारून स्वविकासाच्या पुढच्या पायरीवर जाण्याची आस बाळगतात.

“इथं तर सारं जुनचय्
प्रेम पुनरुत्पादन शब्द रंग रूप वासना हिंसा
सगळं आधीपास्नं तर आहे या जगात ....
यापलीकडे जायचय्
खूप पलीकडे
जिथे मी सापडेन – या सुंदर जगाला चिमटीत पकडून
पुन्हा रंगवू शकेन
असा क्षण सापडेल तिथं (पृ.४१)

मल्लिका अमरशेख यांच्या प्रमाणे स्त्रीदेहाविषयी संवेदन व्यक्त करणारी  मोजकीच अभिव्यक्ती स्त्री कवींनी केली आहे.यात नीरजा आणि सुजाता महाजन यांचाही उल्लेख करावा लागेल.’’स्वत:तल्या परस्त्रीच्या शोधात’’ (२०१६) या सुजाता महाजन यांच्या ५७ क्रमांकाच्या कवितेत(पृ.६४)पाळी सुरु असतानाच्या काळातील स्त्रीच्या वेदनादायी अनुभवाला शब्दरूप दिले आहे.नीरजा यांच्या ‘ती वयात येते तेव्हा’(वेणा ,पृ.२६) या कवितेत असाच स्त्रीविशिष्ट अनुभव व्यक्त करण्याची प्रेरणा दिसते.या मराठी कवितेतील स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व (Female experience ) साकारणाऱ्या अपवादात्मक आणि बंडखोर स्त्री कवी आहेत.

स्त्री कवीची कविता विपुल असली तरी स्त्रीविशिष्ट अनुभव व्यक्त करताना आपल्या अस्तित्वाला कोंडून ठेवणाऱ्या शोषण आणि विषमतागर्भ व्यवस्थेची जाणीव शहरी वातावरणातील कवींना दिसते तशी ती ग्रामीण,कृषीजन्य व्यवस्थेतील स्त्रीला दिसत नाही.हे इथे नोंदवता येईल.

१९९० च्या काळातल्या स्त्री अत्याचाराच्या घटनांमधील पाशवीपणा आणि त्याच पार्श्वभूमीवर महिला आयोगाची स्थापना करून स्त्री सक्षमीकरणाचे प्रयत्न समाजात दिसत होते.द्वंद्वात्मक वातावरणाचा परिणाम हा मराठी स्त्री कवींच्या कवितांमधून दिसतो.निषेधाच्या आणि विद्रोहाच्या तीव्र प्रतिक्रिया कवितेतून व्यक्त होतात.सिसिलिया

Research Hub International Journal

कार्व्हालो यांच्या कवितेतून स्वत:ला पेटवून घेणाऱ्या स्त्रीच्या बळी जाण्याकडे केवळ बघ्याच्या भूमिका घेणाऱ्या संवेदनशून्य समाज संस्कृतीच्या प्रभुत्वाला विरोध करतात.त्याच प्रमाणे सामाजिक कार्यकर्ता ,राजकारणी पुरुष सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात कसा दुटप्पीपणा करतो .अशा पुरुषांच्या मुखवट्या आडची "ओळख"(सुकलेली फुले,पृ १९)देतात.नीरजा यांच्या(स्त्रीगणेशा,२००३) कवितासंग्रहातील पुढील ओळी स्त्रीवादाची कवितेतील आशयात्मक उभारणी करणाऱ्या तसेच,कवी म्हणून कृतीशील हस्तक्षेप करण्यासाठी सक्षमता व्यक्त करतात.

"...खरं तर मला पळवायचे आहेत
लगाम
त्याच्या हातातले
आणि काढून टाकायचा आहे
गर्भाशयाच्या वाटेवरचा
त्याचा अहोरात्र पहारा .
.....
काही असो
आता करावीच लागेल
नाकेबंदी
शरीरावरून जाणाऱ्या
स्वप्नांच्या साऱ्या पाऊलवाटांची (नाकेबंदी ,पृ.३)

**मराठी स्त्री कवींच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या जीवनजाणिवा या स्त्रीवादाच्या मूल्यात्मक जाणिवा कशा ठरतात याची कोरीव मांडणी करून निष्कर्षाची मांडणी करता येईल .**

- भारतीय समाजातील स्त्रीपुरुष दोघेही समाजरचित व्यवस्थेच्या प्रभावाखाली असल्याने कवितेतून 'स्त्री'विषयक जैविक किंवा देह जाणिवा व्यक्त करण्याची प्रेरणा अल्प कवींमध्ये दिसते.याबाबत नीरजा आणि मालिका अमरशेख यांची अभिव्यक्ती प्रभावी ठरली आहे. अविष्कार करताना सुद्धा स्त्रीत्वाची संज्ञा संकोच,अडसर ठरते असे दिसते.
- बहुतेक स्त्री कवी लग्न,कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीच्या स्थान आणि सन्मानाविषयी चिंतन,विवेचन करताना दिसतात. आसावरी काकडे ,अश्विनी धोंगडे,सिसिलिया कार्व्हालो यांची कविता उदाहरणादाखल देता येईल .
- ग्रामीण परिसरातली स्त्री अजूनही पुरुषप्रधान समाज-संस्कृतीच्या अधिपत्याखाली दिसतात.ग्रामीण पुरुष कवींची कविता पुरुषभान बदलायला हवे याविषयी सजग,संवेदनशील झाले असल्याचे एक सकारात्मक चित्र निवडक पुरुष कवींमध्ये दिसते.तशी अभिव्यक्तीची मोकळीक ग्रामीण परिसरातल्या स्त्री कवीला मिळत नाही याचे दर्शन कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून प्रकर्षाने दिसते.अनुराधा पाटील यांची कविता किंवा अरुणा ढेरे यांच्या कविता बरीच आत्मनिष्ठ ,लोकसंस्कृतीशी नाते सांभाळत व्यक्त होते.घरंदाजपणाची समाजमान्य चौकट अभिव्यक्तीची मोकळीक देत नसल्याचे वाचक म्हणून जाणवते.

Research Hub International Journal

- स्त्रीवादाचे जात ,वर्ग विषयक संदर्भ मोजक्याच स्त्री कवी मांडतात.दलित समाजातील स्त्री कवी हिरा बनसोड स्त्री म्हणून मिळणाऱ्या विषमतेला वाचा फोडतात .डॉ.बाबासाहेब आंबेडकर , म.जोतीराव फुले या श्रद्धास्थानांविषयी अभिव्यक्ती करतात. एकूणच पुरुषप्रधान रचित व्यवस्थेला प्रश्न विचारणे,माणूस म्हणून जगण्यातील स्वातंत्र्याची मागणी करणारी, आत्मभान प्राप्त झालेली स्त्री प्रज्ञा पवार यांच्या कवितेमधून साकार होते. स्त्रियांच्या कवितांमधून व्यक्त होणारी मुक्ततेची जाणीव नीरजा आणि प्रज्ञा यांच्या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त होते.
- प्रज्ञा पवार यांनी आरपार लयीत प्राणांतिक’(२००९)या विठाबाई मांग नारायणगावकर यांच्यावर लिहिलेले काव्य हे परिघावरच्या स्त्रीचे जात,धर्म आणि पुरुषकेंद्री अधिसत्ता यांनी केलेल्या शोषणाला विरोध दर्शवत असताना भगिनीभावाने विठाबाईच्या जगण्याच्या वेदनेचे सहसंवेदन व्यक्त केले आहे.
- महानगरातील जीवन ,जातीय दंगली ,वांशिक भावना,धर्माच्या नावाखाली जाळपोळ या समकालीन घटनांवर थेट भाष्य करण्याचे धाडस सिसिलिया कार्व्हालो .नीरजा,प्रज्ञा,कविता महाजन यांनी बाळगले आहे.याबाबत कवींचे शिक्षण,जडणघडणाचा परिसर आर्थिक स्वावलंबन याबाबींनी घडलेलं सक्षमीकरण परिणामपूरक ठरते असे म्हणायला हवे.
- नीरजा,प्रज्ञा पवार आणि कविता महाजन,रजनी परुळेकर यांच्या कवितेतून प्रस्थापित व्यवस्थेला कणखर प्रश्न विचारण्याची प्रेरणा जशी आहे तशी भगिनीभावाची भूमिका बाळगलेली दिसते.
- रजनी परुळेकर यांची कविता पुरोगामी विचारांच्या तर दिसतातच पण त्यांच्या कवितेमधून मध्यमवर्गीय नीती-अनीतीच्या कल्पनांना सुरुंग लावण्याची धाडसी प्रेरणा दिसते.
- १९७५ नंतरच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराने आदिवासी स्त्रीची अभिव्यक्ती कुसुम आलाम,उषाकिरण अत्राम यांची नोंद घ्यावी लागेल.यांची कविता उध्दवस्थ आदिवासी जीवनावर भाष्य करतात.शहरी विकास आणि निसर्गापासून तुटलेपण यांविषयीची परात्मता त्यांच्या कवितेतून व्यक्त होते.सामाजिक न्यायाच्या लढाईसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विचारप्रणाली मार्गदर्शक ठरेल असा विश्वास त्यांच्या कवितेत दिसतो.लेखणीच्या तलवारी उपसून आदिवासी स्त्री आपल्या न्याय्य अधिकार आणि सन्मानासाठी कृतीशील झालेल्या दिसतात.

मराठी स्त्री कवितेचे विश्लेषण करताना लक्षात येते की मराठी स्त्री ही महाराष्ट्रातील १९व्या शतकापासूनच्या प्रबोधनयुगाची अपत्य असल्याने स्त्री म्हणून आपल्या सामाजिक, राजकीय आणि अगदी कुटुंबव्यवस्थेतही आपले सन्मानाचे स्थान शोधण्याची आस बाळगते.स्त्री म्हणून आपले नैसर्गिक अस्तित्व आणि समाजरचित स्त्रीतत्व यांच्यातील द्वंद्वासंदर्भात सतत विचार करताना दिसते. विवाहसंस्थेचे सर्वांगीण प्रारूप उघड करून दाखवणे हे त्यांच्या निर्मितीचे एक प्रमुख सूत्र दिसते. स्त्री ही पुरुषाच्या भोगाचे महत्त्वाकांक्षेचे सुडाचे साधन मानणाऱ्या मर्दुमकीला विरोध दर्शवण्याची प्रेरणा स्त्री कवयित्री प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणाने बाळगतात. स्त्री म्हणून समान संधी आणि व्यक्ती म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य मिळावे याचे आकलन १९७५ नंतर उत्क्रांत होत गेलेले दिसते. कविता महाजन यांच्या कवितेतील वाळवी मालकाच्या चिरेबंदी वाड्याला पोखरून काढण्यासाठी सक्षम होते आणि त्यामागचे कारण शिक्षणाची संधी मिळणे; ही जाणीव दलित, ग्रामीण, आदिवासी कवी आपल्या कवितांमधून ठळकपणे मांडतात.सासर माहेर या प्रस्थापित कुटुंबव्यवस्थेत स्त्रीच्या घरातील निर्वासिताप्रमाणे असणाऱ्या स्थानावर भाष्य

केले जाते. अशाप्रकारे स्त्रीच्या शतकानुशताकातील दुय्यमत्वाचा, अपमानाचा, अनेकस्तरीय कोंडीचा, त्यातील परिणामांसह एक सामाजिक दस्ताऐवजच या कवितांतून ठळकपणे आढळतो. १९९० नंतरच्या स्त्री कविता लिंगनिरपेक्ष जाणीव मुखरित करताना दिसतात.समकालीन स्थित्यंतरावर भाष्य करण्याइतपत स्त्री कवितेचा अवकाश विस्तारलेला दिसतो.ही बाब मराठी स्त्री कविता स्त्रीवादी होण्याच्या एका मूल्यात्मक टप्प्यावर स्थिरावली असल्याचे लक्षण म्हणता येईल.

**संदर्भग्रंथ सूची :**


- धोंगडे अश्विनी, अन्वय (1992), दिलीपराज प्रकाशन, पुणे.
- अमरशेख मलिका, वाळूचा प्रियकर (1979), डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई.
- अमरशेख मलिका, देहऋतु (1999), डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई.
- अमरशेख मलिका, माणूसपणाचं भिंग बदलल्यावर (2007), लोकवाङ्मय गृह, मुंबई.
- नीरजा, वेणा (1994), नीळकंठ प्रकाशन, पुणे.
- नीरजा, स्त्रीगणेशा (2003), ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
- महाजन सुजाता, स्वत:तल्या परस्त्रीच्या शोधात (2016), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
- पवार प्रज्ञा, आरपार लयीत प्राणांतिक (2009), प्र. आ., लोकवाङ्मय गृह, मुंबई..


Research Hub International Journal